**विषय :- ई-एचआरएमएस या संगणक प्रणालीवर सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थितीची नोंद करणे अनिवार्य असलेबाबत.**

**जिल्हा परिषद, सोलापूर**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जा.क्र. जिपसो/साप्रवि-१/कार्या-१/प्र.क्र.०९-२०१७/1659/२०२५**
**दिनांक - /१२/२०२५**
01/01/2026

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, जिल्हा परिषद अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती, रजा, सेवाविषयक माहिती इत्यादी बाबी संगणकीकृत व पारदर्शक पद्धतीने व्यवस्थापित करण्याच्या उद्देशाने शासनाने ई-एचआरएमएस प्रणाली लागू केलेली आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषद मुख्यालयातील आणि पंचायत समिती स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची दैनंदिन हजेरी ई-एचआरएमएस या संगणक प्रणालीद्वारे अनिवार्य करण्यात येऊन त्यानुसार दौरा, रजा इ.नोंदी प्रणालीवर अद्ययावत करणे, उशिरा किंवा गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करणे याबाबत आपणांस यापूर्वी लेखी व वेळोवेळीच्या आढावा सभेमध्येही सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि सर्व अधिकारी व कर्मचारी हे ई-एचआरएमएस प्रणालीवर आपली दैनंदिन हजेरी नोंदवत नसल्याचे, तसेच काही अधिकारी हे दौऱ्यावर/रजेवर जाण्यापूर्वी मुख्यालय सोडण्याची पूर्वपरवानगी घेत नसल्याचे माझे निदर्शनास आले आहे.

सबब, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी खालील सूचना/आदेशाचे काटेकोरपणे पालन करणेबाबत सदर परिपत्रकाद्वारे सक्त सूचित करण्यात येते आहे.

१. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी दिनांक ०१ जानेवारी २०२६ पासून दररोज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ई-एचआरएमएस प्रणालीवर आपली दैनंदिन हजेरी नोंदविणे क्रमप्राप्त राहील.
२. रजा, दौरा इत्यादी सर्व बाबींची नोंद ई-एचआरएमएस प्रणालीवरुनच करणे बंधनकारक राहील.
३. दिनांक ०१ जानेवारी २०२६ पासून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी रजा पूर्वमंजुरी व दौरा पूर्व परवानगी घेणे सक्तीचे राहील.
४. ई-एचआरएमएस प्रणालीतील वैयक्तिक व सेवाविषयक माहिती तात्काळ, अचूक व अद्ययावत ठेवणे ही सर्व संबंधितांची जबाबदारी राहील.
५. सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांच्या ई-एचआरएमएस प्रणालीवरील उपस्थिती नोंदींचे नियमितपणे पर्यवेक्षण व पडताळणी करावी.
६. ई-एचआरएमएस प्रणालीवर उपस्थितीची नोंद न करणे, चुकीची नोंद करणे किंवा प्रणालीच्या वापराकडे दुर्लक्ष करणे हे गंभीर शिस्तभंग मानण्यात येईल.
७. यापुढे ई-एचआरएमएस प्रणालीवरील उपस्थिती नोंदींच्या आधारेच प्रशासकीय कार्यवाही, वेतन विषयक बाबी व इतर सेवा विषयक निर्णय घेण्यात येतील.
८. जे अधिकारी व कर्मचारी आपली दैनंदिन हजेरी सदर प्रणालीद्वारे नोंदविणार नाहीत, त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.
९. वरील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

कुलदीप जंगम (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सोलापूर**

प्रति, खातेप्रमुख (सर्व) जि.प. सोलापूर व गट विकास अधिकारी पं.स. (सर्व)

प्रत - अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.

प्रत - प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.